पावसाची चर्चा यावर्षी पुन्हा एकदा साहजिकपणे सुरु झालेली आहे. त्याला कारणही तसेच आहे. उदगीर भागात आजवर या तारखेपर्यंत ‘न भूतो’ इतका कमी पाऊस पडला असून दिलाशाची भाषा करणेही चुकीचे ठरेल कि काय अशी परिस्थिती आहे. तथापि, अजूनही केवळ आशेवरच अवलंबून रहावे लागणार आहे. कारण जुलै महिन्याचे पंधरा दिवस शिल्लक आहेत आणि आजवरचा अनुभव पाहता, जून-जुलै महिन्यांत झालेल्या अल्पवृष्टीची भरपाई ऑगस्ट महिन्यात पावसाने केलेली आहे.

परंतु, आजवरची आणि यापूर्वीची परिस्थिती मांडण्याच्या उद्देश्याने उदगीर येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयातील शरीरक्रियाशास्त्र विभागाच्या मान्यताप्राप्त वेधशाळेतील अधिकृत व अद्ययावत नोंदींनुसार २००१ सालापासून जून महिन्यात सरासरी १११.२४ मिमी तर जुलैमध्ये २११.८५ मिमी पाऊस पडतो. यावर्षी मात्र, जून महिन्यात केवळ ४१.४ मिमी तर जुलै महिन्यात ५२.४ मिमी पावसाची नोंद झाली. जून-जुलै मिळून पडणाऱ्या ३२३.०९ मिमी पावसापैकी ९३.८ मिमी इतकाच पाऊस पडला आहे. हा पाऊस आजवरच्या सरासरीपेक्षा सुमारे २५% कमी आहे.

यापूर्वी जून-जुलै महिन्यात सर्वात कमी म्हणजे १४३ मिमी पाऊस २००२ साली पडला होता, पण यावेळी अक्षरश: तिपटीने कमी पाऊस पडला आहे. तसेही, आपल्याकडे निम्म्याहून अधिक पाऊस जुलै- ऑगस्ट याच महिन्यांत पडतो. मात्र यावर्षी जूनमध्ये आजवरचा विक्रमी कमी आणि जुलै अर्धा संपला तरी सरासरीच्या एक चुतर्थांश पाऊस पडलेला आहे.

अशा परिस्थितीत पशुपालक व शेतकऱ्यांनी पिकांचे व चाऱ्याचे तसेच, अन्य यंत्रणांनी पाणीपुरवठा व अनुषंगिक नियोजन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नागरिकांनी पाण्याच्या स्त्रोतांचा विचारपूर्वक वापर केला पाहिजे.

तक्त्यांतील व आलेखांतील माहिती त्यास्तव मांडण्यात आली आहे.


JUN
२००३
२००४
२००५
२००६
२००७
२००८
२००९
२०१०
२०११
२०१२
२०१३
२०१४


JUL
२००१
२००२
२००३
२००४
२००५
२००६
२००७
२००८
२००९
२०१०
२०११
२०१२
२०१३
२०१४




उदगीर परिसरात पडलेला गेल्या तेरा वर्षांतील पावसाचे प्रमाण (मिमी)

| वर्ष | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००१ | २०८.२ | ६०.९ | २४९.११ | ५५ | २४६.१ | ० | ८१९.३१ |
| २००२ | ८४ | ५९ | ३१४ | १४३ | ८१ | ३ | ६८४ |
| २००३ | १२४.५ | ३०५.७ | २४५.५ | १०३.४ | ० | ० | ७७९.१ |
| २००४ | ५६.५ | ३५२.९ | ९०.८ | १२५.७ | ५५.६ | २४.८ | ७०६.३ |
| २००५ | ५१.५ | ३४७.४ | १६८ | २७६.२ | १३३.१ | ० | ९७६.२ |
| २००६ | ६४.५ | १७०.५ | २९४.२ | ३०३.९ | २४.८ | ० | ८५७.९ |
| २००७ | २००.४ | ७९.७ | १३१.९ | २७६.८ | ० | १३ | ७०१.८ |
| २००८ | ७६.६ | १०८.८ | १८३.७ | ३४८.२ | ५.३ | ४ | ७२६.६ |
| २००९ | ९७.८ | १०६.२ | २३६ | ९५.६ | ५६.४ | ३७.७ | ६२९.७ |
| २०१० | १२०.८ | ३३३.५ | ५५६.९ | १८२.२ | १४०.८ | ४१ | १३७५.२ |
| २०११ | ५३.६ | ३४४.२५ | २४२.१ | ८३.८ | ६३ | ० | ७८६.७५ |
| २०१२ | १४१.५ | १६८ | १२५.६ | १९३ | १५७ | १७.२ | ८०२.३ |
| २०१३ | १६६.२ | ३१७.२ | १५०.६ | ९५.१ | १७५.५ | ३१.४ | ९३६ |
| २०१४ | ४१.४ | ५२.४ | - | - | - | - | ९३.८ |
| सरासरी | १११.२४ | २११.८५ | २४६.५६ | १८१.२५ | ७४.३१ | १२.३५ | ८२२.०८ |